कोकण सकाळ

शनिवार, दि. २१ जानेवारी २०१२


# रायगडावरील प्लॅस्टिक कचऱ्याच्या समस्येवर रोप-वे चा नामी उपाय

**महाड / निलेश पवार : ऐतिहासिक किल्ले रायगडावर येणाऱ्या पर्यटकांकडुन होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. या प्लॅस्टिक समस्येवर रायगड रोप वे नामी शक्कल लढवुन गेली दोन दिवसात पाच हजारांच्यावर प्लॅस्टिक बाटल्या जमा केल्या आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत असुन प्रशासनाने या कचऱ्याच्या समस्येवर मार्ग काढावा आणि शिवभक्तांनी गडाचे जतन करण्यासाठी स्वच्छता ठेवावी असे, भावनिक आवाहन रोप-वे चे कर्नल व्ही. के. एस. बेडेकर यांनी केले.**



छत्रपती शिवरायांनी आपली राजधानी याच गडावर केली, याच रायगडावर शिवरायांचा राज्याभिषेक झाला, शिवरायांची समाधी याच किल्ले रायगडावर आहे. चारशे वर्षापुर्वीच्या शिवकालीन वैभवशाली इतिहासाची साक्ष येथील वास्तु देत आहे. शिवप्रेमी आणि पर्यटक किल्ले रायगडावर येऊन शिवरायांच्या अमर स्मृतींना अभिवादन करतात याच वेळी ते त्यांचया सोबत आणलेल्या प्लॅस्टिक वस्तुंचा कचरा किल्ले रायगडाच्या कानाकोपऱ्यात टाकुन रायगडाचे विदुषीकरण देखील करीत असतात.पिण्याच्या पाण्याच्या प्लॅस्टिकच्या बाटल्या बिस्कीट, चॉकलेट, वेफर्स सारख्या खाद्यपदार्थावरील प्लॅस्टिक वेस्टन हा या कचऱ्याचा प्रमुख भाग असुन किल्ले रायगडावरील परिसरात हा कचरा प्रामुख्याने दिसुन येऊन किल्ले रायगडाचे ऐतिहासिक वैभव विद्रुप करत होतात. गेल्या काही दिवसांपासुन प्लॅस्टिक कचऱ्याचा प्रश्न वारंवार चर्चेत येत होता. यावर उपाययोजनांच्या नावाने केंद्रीय पुरातत्व विभागाने येथील स्थानिक विक्रेत्यांच्या व्यवसायावर टाच आणली होती. खात्यामार्फत नोटीसा, पोलीस स्थानकात तक्रार, शासकीय अधिकाऱ्यांच्या समोर बैठका अशा अनेक प्रकारे पुरातत्व विभाग येथील स्थानिक व्यवसायिकांना वेठीस धरीत होता. मात्र या प्रकरणात कोणतीही ठोस उपाययोजना पुरातत्व विभागाने केली नाही.

काही दिवसांपुर्वी किल्ले रायगडावर महाडचे प्रांताधिकारी रवींद्र हजारे यांच्या अध्यतेखाली एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत रायगडावरील कचरा हाच प्रमुख विषय घेण्यात आला. या बैठकीत कोणाताच ठोस निर्णय न झाल्याने रायगड रोप वे चे व्यवस्थापक आर.के कुलकर्णी आणि राजेंद्र खातु यांनी आपल्या कल्पनेतुन या कचऱ्याच्या प्रश्नावर मात करण्याचा निर्णय घेतला. रोप वे व्यवस्थापनाशी चर्चा करुन त्यांनी हा निर्णय गुरुवारी अमलांत आणला आणि या निर्णयाच त्यांना यशस्वी फलीत मिळाले असून पर्यटक शिवप्रेमी व स्थानिक नागरिकांनी एका दिवसात सुमारे पाच हजार प्लास्टिक बाटल्यांचा कचरा रोप वे स्टेशनला जमा केला. कचऱ्याच्या समस्येवर मात करण्यासाठी रायगड रोप वे ने त्यांच्याकडुन विकली गेलेली बाटली टाकण्याऐवजी पुन्हा परत केल्यास चार रुपये तर इतर कोणतीही बाटली आणुन दिल्यास २ रुपये देण्याचीच योजना जाहिर केली आणि हाहा म्हणता या योजनेला उत्सफुर्त प्रतिसाद लाभला. निसर्गावर प्रेम करा असे या योजनेला नाव दिले असुन या नावाने हा सप्ताह साजरा केला जाणार आहे, हा सप्ताह साजरा करता असणारा बिस्कीट, वेफर्स, सारखे पदार्थ प्लॅस्टिक वेस्टनासह न देता ग्राहकाकडुन वेस्टन परत घेऊन ते पदार्थ कागदी पिशवीत दिले जात आहे. अशा प्रकारे नाविण्यपुर्ण कल्पना राबवुन रोपवे ने प्रशासनाने रायगडवरील प्लास्टिक कचऱ्यावर मात करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. पुढे जावुन पर्यटक शिवप्रेमींनी गडाचे जतन आणि पावित्र्य राखण्यासाठी स्वच्छता ठेवावी व प्लास्टिक कचरा टाकु नये असे आवाहनही रोप वे प्रशासनाने केले.